
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - I
Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | विदर्भातील आदिवासी साहित्य<br>**डॉ. अजय पेत्रस बोरकर** | १-३ |
| २ | वैदर्भीय कवी शंकर घोरसेंच्या 'बा स्वातंत्र्या' या काव्यसंग्रहातील समाजवास्तव<br>**डॉ. अशोक भक्ते** | ४-९ |
| ३ | वैदर्भीय दलित - आंबेडकरी नाटककार व त्यांची नाटके<br>**प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड** | १०-१५ |
| ४ | पोवाडा : एक स्फूर्तिगान<br>**डॉ. चंद्रकुमार राहुले** | १६-२१ |
| ५ | वैदर्भीय आदिवासी साहित्यातील लोकगीते<br>**प्रा. डॉ. रामलाल रूपचंद चौधरी** | २२-२७ |
| ६ | वैदर्भीय ग्रामीण कथा<br>**डॉ. हेमचंद्र दुधगवळी** | २८-३३ |
| ७ | पूर्व विदर्भाची झाडी बोली<br>**प्रा. जगदिश र. भैसारे** | ३४-३९ |
| ८ | पूर्व विदर्भातील नाट्य परंपरा : एक अवलोकन<br>**श्री जनबंधू मेश्राम** | ४०-४४ |
| ९ | विदर्भातील ब्रह्मपुरी परिसरातील झालीबोली काव्याचे उन्मेष<br>**प्रा. डॉ. धनराज ल. खानोरकर** | ४५-५० |
| १० | विदर्भातील महानुभावांची साहित्य परंपरा<br>**प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे** | ५१-५५ |
| ११ | लोकगीतातील नमनगीते<br>**डॉ. न. ह. खोडे** | ५६-६२ |
| १२ | यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी आंधाच्या लोकगीतांतील नातेसंबंध<br>**प्रा. डॉ. राजेश धनजकर** | ६३-६७ |
| १३ | वैदर्भीय निवडक दलित आत्मकथने<br>**प्रा. डॉ. संजय के. लाटेलवार** | ६८-७४ |
| १४ | वैदर्भीय दलित काव्याचे उन्मेष<br>**डॉ. उज्ज्वला वंजारी** | ७५-८० |

# १२. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी आंधाच्या लोकगीतांतील नातेसंबंध

**प्रा. डॉ. राजेश धनजकर**
कला, वाणिज्य व विज्ञान महा. गंगाखेड जि. परभणी.

महाराष्ट्रात आदिवासींच्या प्रमुख ४५ जमाती असून, त्यातील आंध ही एक अनुसूचित जमात आहे. या जमातीचे वास्तव्य विदर्भ आणि मराठवाडयातील काही जिल्हयात आहे. तसेच तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातही आंध जमात दिसून येते. महाराष्ट्रातील आंध समाज मराठी भाषा बोलताना दिसतो. रोजच्या दैनंदिन व्यवहारातही हे लोक मराठीचाच वापर करताना दिसतात. प्रस्तुत लेखात मी लोकसाहित्यातील एक महत्वाचा घटक म्हणून लोकगीतांची निवड केली आहे. आणि त्यातल्या त्यात आंध जमातीत मौखिक परंपरेने गायिल्या जाणाऱ्या गीतातील नातेसंबंध रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. तसे पाहिले तर, आंध स्त्रिया अनेक प्रसंगाच्या निमित्ताने अनेक प्रकारची गीते गातात. मुळात आंध स्त्री फारच हळवी आहे. तेवढीच ती भावनाशील वृत्तीची आहे. त्यामुळे रोजच्या जीवनात तिला सुखदु:खाचे व काबाडकष्टाचे खूप अनुभव येतात व आलेले अनुभव लोकगीताच्या निर्मितीला कारणीभूत ठरतात. मग त्यात सण—उत्सव प्रसंगीची गीते, विधीगीते, फेरावरची गीते, कौटुंबिक नात्याची गीते, ओवीगीते अशी काही गीते आंध स्त्रियांनी पाठांतराच्या बळावर जोपासून ठेवली. त्यातील ओवीगीते तर त्यांच्या कौटुंबिक नात्यांशी अधिकच घट्ट बांधलेली दिसतात.

कुटुंबात आई—वडिलानंतर बहिणीची काळजी वाहणारा, माहेरपण जपणारा, बहिणीला अतिशय जवळचा वाटणारा माणूस म्हणजे भाऊ होय. भावाने सणसमारंभाला माहेरी न्यावे, घेतली तर साडीचोळी घ्यावी, अलीकडे तिही अपेक्षा नाही व आई—वडिलांची माया लावावी एवढीच माहेरवाशीण स्त्रीची माफक अपेक्षा असते. परंतु बऱ्याचवेळा त्याही अपेक्षेची परिपूर्तता होत नाही. कारण भावाला बहिणीपासून दूर ठेवण्याचे काम वहिनी करते. सर्वत्रच असे चित्र पहायला मिळते असे नाही, परंतु काही अंशी त्यात सत्य दडल्याचे दिसते आणि याच सत्याचा अंश आमच्या आजी—पणजीच्या ओवीगीतात पहावयास मिळतो. तो असा —

''भावाच्या घरी गेलो, भावजय पाहते रागरांग ।
येडया जीवा फिर मागं, नाही बसायचा लागं ।।
भावाच्या घरी गेलो, भावजय डोळे मोडी ।
हिंग शिंप्या तुही घडी, पातळाची काय गोडी ।।
भावाच्या घरी गेलो, भावजय आणा गुन्हा ।
भाऊ मनामधी शहाणा, वरी चढविते आणा ।।''

बहीण भावाच्या घरी गेली तर भावजयीच्या कपाळावर आठया पडतात, भावाकडे बहिणीचे येणेच भावजयीला अडचणीची वाटते. तिच्या चेहऱ्यावर राग दिसायला लागतो. त्यामुळे भावाघरी थांबणे व भावाची

साडीचोळी परिधान करणे उपयोगाचे नाही. त्यापेक्षा आपण आपल्या घरी गेलेले बरे असे बहिणीला वाटते. परंतु एखादा भाऊ शहाणा व समजूतदार असतो. तो बहिणीची काळजी वाहतो. तरीही भावजयीचा मूळ स्वभाव काही केल्या जात नाही. बहिणीला साडीचोळी घेण्यासाठी भाऊ बाजारला जातो. तेव्हा तिथेही महागडी साडीचोळी घेण्यापासून भावाला परावृत करते. ती अशी –

भाऊ चोळी घेते, भावजय मारे हाका ।
उच्या पालामंदी नका, चोळीचा रंग फिका ।।''[१]

मोठया दुकानात जाऊन भारी किंमतीची साडीचोळी घेण्यापेक्षा साध्या पालाच्याच दुकानात साडीचोळी घ्यावी असे भावजयीला वाटते. एकूणच काय तर नणंदेसाठी हलकी व कमीत कमी किंमतीची साडीचोळी घेण्याचे ती सांगते. या ठिकाणी भावाबरोबरच बहिणीलाही तेवढेच दु:ख होते. अजूनही अशा हजारो भावजया लोकजीवनात वावरताना दिसून येतात.

सासरकडील मंडळीत सर्वात महत्वाची व्यक्ति म्हणजे पती होय. पतीशिवाय तिचे पानच हलत नाही. म्हणून पतीला स्त्रीच्या सौभाग्याचे लेणे म्हटल्या जाते. तसेच सासरचा एकमेव आधार म्हणून पतीकडे पाहते. परंतु बऱ्याचवेळा तिला याच्या उलट अनुभव येतो. ज्या कुटुंबात पती–पत्नीमध्ये खेळीमेळीचे वातावरण असते, अशा ठिकाणी आंध स्त्रीला आपल्या नवऱ्याची टिंगल–टवाळी करायला बरे वाटते. बऱ्याचवेळा त्यातून विनोदनिर्मिती केली जाते.

''मला खावा वाटलं खोबरं,
अन् कोठं गेलकी माय आमच्या येथलं डेबरं''[२]

या स्वरूपाच्या गीतातून आंध स्त्रीला आपल्या पतीची चेष्टा करायला आवडते, परंतु प्रत्येक स्त्री चेष्टा करेलच असे नाही. कारण की, काही स्त्रियांचे पती तापट स्वभावाचे असतात. त्यामुळे आंध स्त्री शक्यतो चेष्टा करण्याचे टाळते.

आंध समाजातील स्त्रीने माहेरच्या नात्याप्रमाणेच सासरच्या नात्याचेही तेवढेच भावस्पर्शी चित्रण आपल्या लोकगीतांतून केले आहे. सासरच्या कुटुंबामध्ये पतीनंतर सासुचे नाते फार महत्वाचे मानले जाते. कारण सासुचा अनेक कामाच्या निमित्ताने सुनेशी संबंध येतो. त्यामुळे ज्या सुनेला आईसारखी सासू मिळेल ती सून भाग्यवानच समजायला हरकत नाही. परंतु तसे काही फारसे पहायला किंवा ऐकायला मिळत नाही. तर सासू–सुनेची कडाक्याची भांडणे पहायला व ऐकायलाच मिळतात.

''सासू मही हाय धांगडी,
तिला परपंच्याची बेडी.
गालगुसे घेते गालला,
गांजिते शिव्या देते मला''[३]

सासू सुनेला केवळ शिव्याच देते असू नसून, प्रसंगी मारहाणदेखील करताना दिसते. या स्वरूपाचा सासुरवास हा तिला आयुष्यभर सहन करावा लागतो. ती करते. सासरकडील मंडळीने कितीही छळले तरी

तिला ते निमूटपणे सहन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. कारण सासुरवास म्हणजे आपल्या कर्माचे फळे आहे असे आंध स्त्रीला वाटते.

सासुला पूर्वी घरादारातील जी कामे करावी लागत होती, ती कामे आजकालच्या सुनेला करण्याची तेवढी गरज नाही. कारण की अलीकडच्या काळात विज्ञान व तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे सर्व सोईसुविधा उपलब्ध होत आहेत. घरातील पाण्याची भराभर करायची झाल्यास, डोक्यावर घागर घेऊन दूरवरच्या विहिरीवरून पाणी आणावे लागत होते. दळण दळायचे झाल्यास सकाळी चार वाजता उठून जात्याची मूठ हातामध्ये पकडावी लागत असे. परंतु आज आंधाच्या वाडी, वस्ती, घरादारात व राहणीमानात बदल होत आहे, ही एक समाधानाची बाब आहे. अशा या बदलाच्या अवस्थेचे चित्रण आंध स्त्रीने आपल्या गीतात केले आहे.

''आमच्या सासुबाई घागर घेऊन पाण्याला पळं,
आमच्या राज्यात आलेल नळं,
आमच्या सासुबाई दळूदळू मेल्या,
आमच्या राज्यात गिरण्या आल्या,
आमच्या सासुबाईला झोपाया नव्हती ग खाटं,
आमच्या राज्यात आलेल लाटं,

सासुच्या वाटयाला आलेल्या बिकट परिस्थितीचे चित्रण आंध स्त्रीने आल्या ओवीगीतातून केले आहे. आंधाच्या वाडी–दरीत आता नळाची व्यवस्था झाली. दळण दळण्याचे जाते आता अडगळीत पडले आहे. लग्नविधीप्रसंगी दळण दळण्यासाठी तेवढाच आता जात्याचा उपयोग. त्यामुळे रामपाऱ्यात आता कुणीही जात्यावर दळण दळणार नाही व नव्या ओव्यांची निर्मितीही होणार नाही. उलट अस्तित्वात असलेल्या ओव्याच काही दिवसांनी गडप होतील. त्यामुळे ज्या कुणी या ओव्या लिखित रूपात जतन करून ठेवल्या त्यांना नवतरूण स्त्रियांकडून धन्यवाद. आज प्रत्येक गावात गिरण्या आल्या. त्यामुळे जात्याची घरघर जवळजवळ थांबल्यात जमा आहे. खेडयापाडयात विजेची व्यवस्था झाल्यामुळे चिमणी (दिवा) दिसेनाशी झाली आहे.

''आमच्या ग सासुबाई व्हत्या ग येडया ।
आमच्या त राज्यात आल्यात साडया ।।
आमच्या सासुबाईला नव्हता ग झाडू ।
आमच्या उशाला वाजते रेडू ।।
आमच्या ग सासुबाईचा किलव–छटाक व्हता ग खोटा ।
आमच्या त राज्यात सोडल्या नव्या नोटा ।।''[४]

आंध स्त्रीची पूर्वी कपडयाच्या बाबतीत फारच अबाळ होत होती. फाटक्या –तुटक्या लुगडयांची ढिगळं जोडून त्यांना एक नवीन लुगडे तयार करावे लागत होते व तेच लुगडे परिधान करून कामाला जावे लागत असे. आंध स्त्रिया पूर्वी सहावारी साडया नेसत नव्हत्या, तर त्या नऊवारी लुकडेच परिधान करीत

होत्या. अलीकडे या समाजातील मुली सहावारी साडी नेसताना दिसतात, तर शहरी भागातील नोकरदार वर्गाच्या बायका पंजाबी ड्रेसवर वावरू लागल्या.

आज आंध स्त्रीच्या हातात फडयाऐवजी झाडू आला. पूर्वी आंधाच्या वाडी किंवा वस्तीवर एखादाच रेडिओ असायचा. संध्याकाळ झाली की, वाडीतील लोक एकत्र येऊन रेडिओच्या भोवताली बसत व ऐकत. तेव्हा लोकांना रेडिओचे खूपच नवल वाटत असे. आज रेडिओ तर गेलाच परंतु त्या ठिकाणी डिशचे कनेक्शन आले. पूर्वीचा किलो आणि छटाक (पन्नास ग्रॅम) आज खोटा ठरू लागला. चार आणे आणि बारा आण्याचा काळ जाऊन त्या ठिकाणी नोटांचा सुकाळ झाला, ही बदलांची नोंदी आहे. आंध स्त्री शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्यामुळे आज तिच्या राहणीमानात, आचारविचारात व एकूण वर्तनात बदल होत आहे. ही आंध समाजासाठी अतिशय अभिमानाची बाब आहे.

यवतमाळ जिल्हयातील आंध जमातीच्या लोकजीवनात साडुची थट्टामस्करी व टिंगल टवाळी करण्याची परंपरा फार जूनी आहे. आंध समाजात लहान किंवा मोठया बहिणीच्या पतीला साडू म्हटले जाते. साडुचे नाते हे चेष्टा करण्याचे, थट्टामस्करी व टिंगलटवाळी करण्याचे मानले जाते. आंधाच्या लग्नप्रसंगी मेहुणा व मेहुणी यांच्यामध्ये अश्या प्रकारची थट्टामस्करी बराचवेळ चालते. बऱ्याचवेळा साडुच्या रंगाचे, रूपाचे, स्वभावाचे व त्याच्या बोडखेपणाचे वर्णन अतिशयोक्तिने करून त्याला ओवीत गुंफले जाते. ते असे.

"साडू ग सावळा, हे त हिंडते बोडखा ।
यांच्या शेंडीला दोडका ।।

साडू फारसा बोलका नसेल तर त्याची साडवीन (मेहुणी) त्याला अधिकच भंडावून सोडते. त्यांच्या चेष्टेला सीमाच राहात नाही. साडुच्या डोक्याला रूमाल नसल्यामुळे त्याच्या शेंडीला दोडका बांधण्याचे काम मेहुणीने केले. कधी कधी तर साडुच्या भोळया वागण्याला हेरण्याचे काम आंध स्त्रीं करते. ती अशी

साडू गं सावळा, आंथरण पळहाटयाचं।
नेसंण महया साडुचं गळहाट्याचं।

एखादा साडू अगदीच साधाभोळा असेल तर त्याचा साधेपणा मेहुणीच्या थट्टेचा विषय होतो. साडुच्या सावळेपणाचे जसे वर्णन केले जाते. त्याचबरोबर त्याच्या अवयवांनाही ओवीमध्ये बंदिस्त करण्याचे काम आंध स्त्री करते. ते असे –

साडू ग सावळा, याचे कुशावाणी दांत ।
अन् सिंधू भिती अंधारात ।।"[५]

ज्या साडुचे दात कुशावणी आहेत, असा साडू म्हणजे आक्राळविक्राळ रूपच त्यातल्या त्यात काळासावळा साडू अन त्याचे कुशावाणी दात. अशा रूपाचा साडू अंधारात उभा राहिला तर सिंधूच काय कुठल्याही स्त्रीला भीती वाटणारच. एकूणच काय तर साडुच्या व्यक्तिमत्वासंबंधिच्या विविध स्वभावाचे चित्रण करताना आंध स्त्री दिसते.

आदिवासी आंध समाजाच्या लोकजीवनात एक अभिमानाचे व समाधानाचे नाते म्हणून जावयाकडे पाहिले जाते. मायबापाच्या लाडक्या लेकीचे सुख जवळजवळ त्याच्यावरच अवलंबून असते. म्हणून सासऱ्यापेक्षा सासूच आपल्या ज़ावायाच्या पुढे पुढे करते. पूर्वीच्या काळी आंध स्त्रिया जावाई घरी आला, की त्याच्या पुढे जात नसत. परंतु आज असे काही राहिलेले नाही. जावाई सुंदर, देखणा, सुस्वभावी असेल तर आपली लेक आनंदात राहील असे आंध स्त्रीला मनोमन वाटते. जावयाला बघून ती आनंदीत होते. तसे पाहिले तर, आंध समाजात जावयाबद्दल बरेच चांगले वाईट बोलले जाते.

सासूला मात्र जावाई कसाही असो, तो चांगलाच वाटतो. नवी कोरी साडी नेसून रस्त्याने चालणारी लेक व हाताला घडयाळ बांधून चालणारा जावाई अशी लेक जावयाची जोडी तिला उठून दिसते.

''बाई वाटनं चालल्या,
एक बवा एक बाई
साडीवाली उषा मही
घडीवाला ग जावाई''[६]

आंध समाजातील विविध नात्यांचे संबंध, त्यांच्या रूढी, परंपरा, कौटुंबिक जीवनात त्यांचे स्थान अशा विविध पैलुंचे व सामाजिक परंपरेचे चित्रण आंध स्त्रीने आपल्या लोकगीतांतून केले आहे.

**संदर्भ**

१. सौ.सुमन शिवाजी चिरमाडे मु.पो. मांडवा ता. पुसद जि. यवतमाळ
२. सौ.शेषकला दत्ता पांडे, मु. सांडवा ता. पुसद, जि. यवतमाळ
३. सौ. उषा भानुदास बोंबले, रात्र धनन पो. मुळावा तात्र उमरखेड जि. यवतमाळ.
४. सौ. रेशमा परसराम गव्हांडे, मु. पांगरवाडी पो. गौळ ता. पुसद जि. यवतमाळ.
५. सौ. कलावती नागोराव खोकले, मु.मोहदरी पो. मुळावा ता. उमरखेड जि. यवतमाळ.
६. लक्ष्मीबाई आनंदराव टारफे, मु.पो. आडगांव ता पुसद जि. यवतमाळ.